**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - संकीर्ण - २०१८/(२६७४/१८)/वेतनपथक, पुणे दिनांक - १० डिसेंबर, २०२०

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,

विधी, शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय - याचिका कमांक १९१३/२०१३ महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲन्ड कॉलेज टीचर्स
याचिका क्रमांक २२९०/२०१५ बॉम्बे युनिव्हर्सिटी ॲण्ड टिचर्स युनियन,
याचिका क्रमांक २८२५/२०१४ डॉ. सुभाष अमर सावंत
विरुध्द
महाराष्ट्र शासन व इतर.

संदर्भ - १. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक न्यायाप्र-२०१५/प्र.क्र.५७१/१५/
विशि-१ दिनांक ०७ डिसेंबर, २०२०.
२. मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक अर्थसं-२०
-२१/(१२/२०)/संप वेतन/अनु.वित-१/लेखा-२/८३०४ दिनांक ०९ डिसेंबर २०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भामध्ये नमूद केलेल्या शासन निर्णय दिनांक ०७ डिसेंबर, २०२० चे आणि मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दिनांक ०९ डिसेंबर, २०२० च्या पत्राचे कृपया अवलोकन करावे. सदरहू शासननिर्णय आणि पत्रान्वये दिनांक ०४/०२/२०१३ ते १०/०५/२०१३ या कालावधीमध्ये जे शिक्षक कर्मचारी संपावर होते त्यांना वेतनाची रक्कम अदा करण्याबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार आता या पत्रान्वये आपल्या महाविद्यालयातील जे शिक्षक कर्मचारी संपावर होते व ते ज्या कालावधीपर्यंत संपावर होते आणि ज्यांचे वेतन या कार्यालयाने अदा केलेले नाही अशा सर्व शिक्षकांची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये सादर करावी. सदरहू माहिती सादर करतांना खाली दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे -

१. या कार्यालयाने सन २०१३-१४ या वर्षातील माहे मार्च, २०१३ ते १० मे, २०१३ या कालावधीमध्ये जे शिक्षक कर्मचारी संपावर होते त्यांचे त्यांच्या संपाच्या कालावधीमधील वेतन अदा केलेले नाही. त्यामुळे आपल्या महाविद्यालयांतील शिक्षक कर्मचा-यांची माहिती पाठविताना उपरोक्त कालावधीचीच माहिती सादर करावी.

२. उपरोक्त कालावधीमध्ये जे शिक्षक ज्या महाविद्यालयामध्ये कार्यरत होते त्याच महाविद्यालयामधून त्यांची उपरोक्त कालावधीच्या वेतनाची माहिती सादर करावी. म्हणजेच जे शिक्षक कर्मचारी बदलीने सध्या दुस-या महाविद्यालयात रुजू झालेले असतील त्यांची बदलीच्या ठिकाणी रुजू झालेल्या महाविद्यालयातून वेतनाची मागणी न करता मार्च, २०१३ ते १० मे, २०१३ या कालावधीमध्ये ते ज्या महाविद्यालयामध्ये कार्यरत होते तेथूनच वेतनाची मागणी करावी.

३. जे शिक्षक कर्मचारी आता सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्त/सेवा सोडून गेले आहेत/मयत झालेले आहेत किंवा माहे फेब्रुवारी, २०२१ पर्यत सेवानिवृत्त होणार आहेत त्यांच्या भविष्य निर्वाह निधीची वर्गणीची कपात करण्यात येऊ नये.

तसेच सदरहू माहिती सादर करतांना खालील प्रमाणपत्र महाविद्यालयाच्या लेटरहेड वर प्राचार्यांचे स्वाक्षरीने सादर करावे.

**प्रमाणपत्र**

मी-------------------------------------प्राचार्य/प्रभारी प्राचार्य या द्वारे प्रमाणीत करतो की -------------------- -------------- या महाविद्यालयातील जे शिक्षक दिनांक ०१ मार्च, २०१३ ते १० मे, २०१३ या कालावधीमध्ये संपावर होते त्यांना सदरहू कालावधीची देय ठरणारी सोबत स्टेटमेंट १ मध्ये नमूद केलेली वेतनाची रक्कम ही मी स्वतः कार्यालयीन अभिलेख तपासून सादर करीत असून याबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबतची पूर्ण जबाबदारी माझी राहील.

प्राचार्य

-----------------------------------------------

-----------------------------------------------

तरी वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण आपल्या महाविद्यालयाची माहिती आपले माहे डिसेंबर, २०२० चे वेतन देयक ज्या दिवशी सादर करण्याबाबत या कार्यालयाने सूचना दिलेल्या आहेत त्याच दिवशी payunit@jdhepune.info या इमेल आयडी वर Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्ट मध्ये तयार करुन इमेलद्वारे प्रमाणपत्रासह सादर करावी.

**सही/-**
(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

**STATEMENT 1**

**STATEMENT SHOWING THE AMOUNT OF STRIKE PERIOD SALARY FOR THE PERIOD 01/03/2013 TO 10/05/2013**

Name of the College -

College Code - HTE Sevaarth ID -

| S. N. | Name of the Employee | **March 2020** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Gross Salary | G P F Deduction | Prof Tax | Total Govt. Deduction (4+5) | Net Salary (3-6) | Salary Given | Salary tobe paid (7-8) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | **TOTAL** | | | | | | | |

| S. N. | Name of the Employee | **April 2020** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Gross Amount of Salary | G P F Deduction | Prof Tax | Total Govt. Deduction | Net Salary | Salary Given | Salary tobe paid |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | **TOTAL** | | | | | | | |

| S. N. | Name of the Employee | **May 2020** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Gross Amount of Salary | G P F Deduction | Prof Tax | Total Govt. Deduction | Net Salary | Salary Given | Salary tobe paid |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | **TOTAL** | | | | | | | |